**--प्रेसनोट--**

**दक्षिण सायबर पोलीस ठाणे गुन्हे. शाखा, मुंबई यांनी CEO/BOSS Fraud या सायबर गुन्ह्या मध्ये सिम कार्ड पुरविणारे POS व त्याचा पुढील हस्तक यास बिहार व झारखंड येथून अटक करून ७ गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न करून,१६१ सिम कार्ड, मोबाइल फोन व इतर साहित्य जप्त केलेबाबत...**

---

दिनांक २६/०२/२०२६ रोजी ४३ वर्षीय फिर्यादी यांच्या मोबाईलवर अज्ञात इसमाने व्हॉटसऍप क्रमांकावरून संपर्क करून आरोपीने स्वत: कंपनीचे डायरेक्टर असल्याचे भासवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून फिर्यादी यांना रु ४८,६०,५११/- (अठठेचाळीस लाख साठ हजार पाचशे अकरा) इतकी रक्कम पाठवण्यास भाग पाडले म्हणुन फिर्यादी यांच्या तक्रारीवरून दि २६/२/२०२६ रोजी **गु.र.क्र १५/२०२५** कलम ३३८(३),३१९(२)भारतीय न्याय संहिता सह ६६(क),६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्ह्यातील फसवणुक झालेली सर्व **रक्कम - ४८,६०,५११/-रुपये रक्कम होल्ड करण्यात पोलीसांना यश आले आहे**

या गुन्ह्यांमध्ये फिर्यादी यांच्या कार्यालयाच्या क्रमाकावर व व्हॉटसऍप क्रमांकावर कंपनीचे डायरेक्टर असल्याचे भासवून संपर्क करण्यासाठी वापरण्यात आलेले सिम कार्डस हे महाराजगंज बिहार येथील रहिवासी व इतर नागरिकांच्या कागदपत्रांचा आणि ई-केवायसी (E-KYC) चा गैरवापर करून बेकायदेशीरपणे चालू करण्यात आली होती. हा सर्व प्रकार सिवान बिहार राज्य येथील एअरटेलचा सिम विक्रेता (POS) आमिर चांद मोहम्मद खान याने केला होता. त्याने ग्राहकांच्या नकळत त्याचे जुना क्रमाक पोर्ट आउट करुन देतो असे संागुन सिम कार्ड्स ॲक्टिव्ह केली आणि ८ सिम कार्ड ही दुसरा अटक आरोपी सूरज प्रदीप साव उर्फ विशाल याला ६,००० रुपयांना विकली. या व्यवहाराचे पैसे सूरजने आमिरच्या एअरटेल पेमेंट बँक खात्यावर यूपीआय (UPI) द्वारे पाठवले होते. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास पथकाने सर्वप्रथम १४ ऑगस्ट २०२६ रोजी आमिर खान याला रुकनदीपूर (सिवान, बिहार) येथून ताब्यात घेतले व त्याची कसून चौकशी केली असता, त्याने दिलेल्या माहिती चे तांत्रिक विश्लेषण करुन 08 सिम कार्ड पुरवलेल्या आरोपी सूरज कुमार प्रदीप कुमार सॉव याला कुमारधुबी, तालुका-चिरगुंडा,झारखंड येथून दिनांक १६/०८/२०२६ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपींनी अशाच प्रकारचे सात गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्यापैकी दोन दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे. मुंबई (गु र क १५/२६ व ४५/२६) तसेच पंजाब, गुरूग्राम हरीयाणा , नवी दिल्ली, पं. बंगाल, व तमिळनाडू येथील प्रत्येकी एका गुन्हयात सहभाग असल्याचे NCRP तक्रारीवरुन निष्पन्न होत आहे.

**<u>अटक आरोपींकडून खालील मुद्देमाल जप्त केल आहे</u>**

१) १६१ एअरटेल सिम कार्ड्स
२) मेगाफोन
३) सिम कार्ड चालू करण्यासाठी वापरले जाणारे 'एअरटेल मित्र' ॲप असलेला POCO कंपनीचा मोबाईल

**<u>अटक आरोपींचे नावे</u>**

१)आमीर चांद मोहंमद खान (वय २२, रा. रुकुंदीपूर, सिवान, बिहार) एअरटेल सिम वितरक
२) सूरज कुमार प्रदीप कुमार साव उर्फ विशाल (रा. कुमारधुबी, धनबाद, झारखंड)

**नागरीकानां आवाहन करण्यात येते की,अनोळखी नंबरच्या व्हॉटसऍप वर ओळखीच्या इसमाचा फोटो ठेवुन पैसे पाठविण्यास सांगीतल्यास नेहमीच्या नंबरवर संपर्क साधुन खात्री करावी. व जर आपली सायबर फसवणुक झाली असल्यास १९३० वर त्वरीत संपर्क साधावा. आपल्या नावावर सिमकार्ड घेवुन किवां बॅक खाते उघडुन दुस-यास वापरण्यास देवु नये. आपल्या नावावर किती सिमकार्ड जारी करण्यात आली आहे याबाबत Sanchar Saathi Portal वर तपासणी करावी.**

नमुद गुन्ह्यातील सिम कार्ड पुरविणारे व हॅडलर यांना अटक करण्यात दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांना यश आले आहे. सदरची प्रशंसनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री.अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे) श्री. बजरंग बनसोडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.सायरस इराणी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार गोपाळे, स.पो.नि.रामदास गोपाळ व पोलीस पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली.